# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिंटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 14 एप्रिल 2021.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 16 एप्रिल 2021.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 20 एप्रिल 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 20/04/2021.

विषय:- कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून अत्यावश्यक सेवा (Essential Services) व सूट दिलेल्या बाबी (Exemption Category) सकाळी 7 ते दुपारी 11 पर्यंत चालू ठेवणेबाबत.

आदेश:-

उस्मानाबाद जिल्ह्यात वाढत असलेल्या कोविड-19 च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 5 च्या आदेशातील मुद्दा क्र. 3 मध्ये नमूद अत्यावश्यक सेवा (Essential Services) व सूट दिलेल्या बाबी (Exemption Category), व मुद्दा क्र. 1 (e)(ii) नुसार जिल्ह्यातील सर्व न.प/न.पा./न.पं. हद्दीच्या क्षेत्रात व हद्दीबाहेर 10 कि.मी. अंतराचे आतील भागात असणारे सर्व पेट्रोल पंप यांना सकाळी 7 ते दुपारी 2 पर्यंत चालू ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती.

संदर्भ क्र. 6 च्या महाराष्ट्र शासनाच्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवा सकाळी 7 ते सकाळी 11 वाजेपर्यंत चालू ठेवण्यास आदेशित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने उस्मानाबाद जिल्ह्यात खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आदेश देण्यात येत आहे.

1. सर्व किराणा दुकाने, भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेते, दुध संकलन व वितरण केंद्र, बेकरी, मिठाई दुकाने, सर्व प्रकारची खाद्यपदार्थांची दुकाने (चिकन, मटन, पोल्ट्री, मासे व अंडी यांसह), कृषि अवजारे व कृषि उत्पादनांशी संबंधित दुकाने, पाळीव प्राण्यांच्या खाद्याची दुकाने, आगामी पावसाळा ऋतूच्या अनुषंगाने अत्यावश्यक असलेल्या व्यक्ती व संस्थांकरिता अत्यावश्यक असलेल्या साहित्याची दुकाने सकाळी 7 ते सकाळी 11 या वेळेतच चालू राहतील.

2. संदर्भ क्र. 5 च्या आदेशानुसार पूर्ण वेळ चालू ठेवण्यास मुभा दिलेल्या मुद्दा क्र. 1 व 2 मध्ये नमूद अत्यावश्यक सेवा (Essential Services) व सूट दिलेल्या बाबी (Exemption Category) वगळता उर्वरित सर्व अत्यावश्यक सेवा (Essential Services) व सूट दिलेल्या बाबी (Exemption Category) तसेच



Scanned by CamScanner

जिल्हयातील सर्व न.प/न.पा./न.पं. हद्दीच्या क्षेत्रात व हद्दीबाहेर 10 कि.मी. अंतराचे आतील भागात असणारे सर्व पेट्रोल पंप हे केवळ सकाळी 7 ते सकाळी 11 पर्यंतच चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि सर्व राष्ट्रीयकृत/सहकारी/खाजगी बँका, पोस्टाच्या (डाक विभागाच्या) सेवा दुपारी 2 पर्यंत नागरिकांसाठी चालू ठेवता येतील व दुपारी 2 नंतर नागरिकांसाठी या सेवा बंद करुन (प्रवेशद्वार बंद करुन) अंतर्गत कार्यालयीन कामकाज करता येईल.

3. **नागरिकांना मुद्दा क्र. 1 व 2 मधील सेवांचा लाभ घेण्यासाठी सकाळी 11 नंतर (बँका व पोस्टाच्या सेवांकरिता दुपारी 2 नंतर) बाहेर पडण्यास/संचार करण्यास मनाई राहील.** परंतु संदर्भ क्र. 4 च्या मूळ आदेशातील उर्वरित इतर अत्यावश्यक सेवांची (Essential Services) व सूट देण्यात आलेल्या बाबींची (Exemption Category) कार्यालये सकाळी 11 नंतर रात्री 8 पर्यंतच्या कालावधीत नागरिकांना कार्यालयाच्या आतमध्ये प्रवेश न देता (प्रवेशद्वार बंद करून) कार्यालयीन कामकाजासाठी चालू ठेवता येतील. (याठिकाणी काम करणा-या व्यक्तींनी कामकाज संपल्यानंतर बाहेर पडताना संबंधित विभागाने निर्गमित केलेले ओळखपत्र बाळगणे बंधनकारक राहील.)

4. संदर्भ क्र. 4 च्या मूळ आदेशानुसार बंद असलेल्या सर्व आस्थापना, सार्वजनिक ठिकाणे, बाबी/उपक्रम, सेवा पूर्णवेळ बंद राहतील. तसेच संदर्भ क्र. 4 च्या मूळ आदेशातील ज्या तरतुदींमध्ये या आदेशाद्वारे बदल करण्यात आलेला नाही त्यांचेबाबत संदर्भ क्र. 4 च्या मूळ आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आज दिनांक 20/04/2021 पासून तात्काळ लागू करण्यात येत असून सदर आदेश दिनांक 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.



Scanned by CamScanner

8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. ज़ि. का. उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद.
14. उपअभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, उस्मानाबाद.
15. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर.
17. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
18. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
19. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner